# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक २३/०९/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### पो.स्टे. पारशिवनी हद्दीतील सालई (माहुली) येथे सुरु असलेल्या अवैधरीत्या सुरु असलेल्या रेती उत्खनन व साठवणुकीवर पारशिवनी पोलीस व महसूल खात्याची संयुक्त कार्यवाही

दिनांक २०/०९/२०२४ रोजी रात्री दरम्यान पारशिवनी पोलीस स्टेशन तसेच तहसील कार्यालय पारशिवनी येथील पथक पो.स्टे. परिसरात अवैधरीत्या रेती उत्खनन करणाऱ्यांची माहिती काढत असता बातमीदाराकडून माहिती मिळाली कि, पो.स्टे. परिसरातील सालई (माहुली) शिवारातील पेंच नदीच्या पात्रातून अवैध रेतीचे उत्खनन करून रेतीची साठवणूक केली जात आहे, यावरून मिळालेल्या माहिती प्रमाणे व मा. वरिष्ठांचे आदेशाने महसूल खात्याचे कर्मचारी व पोलीस अधिकारी कर्मचारी सोबत मिळून पेंच नदीच्या काठावरील कास्तकार नामे आंनदराव संतोष झोड व इतर कास्तकाराचा यांचे शेत जे येरखेडा कामठी येथील शोएब असद यांनी विकत घेतले असून सदर शेतात पेंच नदीच्या पात्रातून अवैधरित्या उत्खनन करून शेतात साठवणूक केलेल्या अंदाजे ४०० ब्रास रेती साठा दिसून आल्याने तो साठा तसेच रेतीचे उत्खनन व साठवणूक करण्यासाठी वापरलेले त्याच परिसरात मिळून आलेले एकून चार १० चाकी टिप्पर ट्रक व दोन एस्केवेटर मशीन असा एकुण १,०६,२०,०००/— रू चा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. सालई (माहुली) येथील तलाठी यांनी दिलेल्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपीतांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरु आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक श्री रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन पारशिवनी चे ठाणेदार राजेशकुमार थोरात, पोउपनि शिवाजी भताने, स. फौ. देवानंद उकेबोंद्र, पोहवा मुदस्सर जमाल, मंगेश ढवाले, सुरेश धुर्वे, पोअं राहुल तभाने, विरेंद्रसिंग चौधरी, राकेश बंधाटे, पृथ्वीराज चौव्हान, चालक संजय देशमुख यांचे तसेच महसुल खात्याचे तलाठी विश्वजीत पुरकाम, गणेश चव्हान, कृष्णा माने, जमील शेख यांचे पथकाने संयुक्त केली.

# कळमेश्वर पोलीसाची कार्यवाही मोटार सायकल चोरा कडुन एकुण ०९ मोटार सायकली जप्ती

दि. २१/०९/२०२४ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाल्याने त्यांनी आरोपी १) तेजस अबंर रामावत वय २२ वर्ष रा. ब्राम्हणी बायपास रोड कळमेश्वर २) विक्की उर्फ खुटी रामकृष्ण भलावी वय १८ वर्ष रा. येरला ता. जि. नागपुर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता पोलीसांना त्यांच्या कडुन पोलीस स्टेशन कळमेश्वरची ०१ मोटरसायकल, ०२ पाण्याच्या मोटार पंप, नागपूर शहर हद्दीतील पोलीस स्टेशन बजाज नगर ०१ मोटरसायकल, सिताबर्डी–०१ मोटरसायकल, गिटटीखदान–०४ मोटरसायकल, हुडकेश्वर–०१ मोटरसायकल, नागपुर शहर व सेलु–०१ मोटरसायकल जि. वर्धा हददीतुन चोंरी केलेल्या एकुण ०९ मोटार सायकल व ०२ पाण्याच्या मोटार पंप पोलीसांनी जप्त केल्या असुन **त्यामध्ये** १) एक काळया रंगाची हिरो कंपनीची स्पेडर प्लस मोटार सायकल क्र. MH40/CP2636 ज्याचा इंजीन क्र. HA11EAN5M55590 चेचिस नंबर MBLHAW179N5MO5377 २) एक काळया रंगाची होन्डा कंपनीची युनिकॉन मोटार सायकल क्र. नबर प्लेट नसलेली जिचा चेचिस नंबर NE4KC09CCD8517516 इंजीन क्र. KC09E-8- 6526813 ३) एक काळया रंगाची होन्डा कंपनीची युनिकॉन मोटार सायकल क्र. नबर प्लेट नसलेली जिचा चेचिस नंबर NE4KC093C98054031 इंजीन क्र. KC09E-10-105589 ४) एक काळया रंगाची होन्डा कंपनीची युनिकॉन मोटार सायकल क्र. नंबर प्लेट नसलेली जिचा चेचिस नंबर ME4KC3156K8003849 इंजीन क्र. KC31E82003958 5) हिरो होंडा सी बी शाईन मोटार सायकल क्र. MH40/S6825 6) हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल क्र. MH31/BA8594 7) एक काळया रंगाची हिरो होंडा स्प्लेंडर नंबर प्लेट नसलेली चेचिस नंबर 05F16C37702 इंजीन क्र. 058F15M37512 8) एक हिरो कपंनीची प्लेझर मोपेट मोटर सायकल इंजिन क्र. JF16EBBGL16401 9) एक हिरो स्प्लेंडर मोटार सायकल क्र. MH49/AN5388 व दोन पाण्याच्या मोटारपंप किंमती ५००० रू. असे पोलीस स्टेशन कळमेश्वर हददीतील ०२ व इतर पोलीस स्टेशन हददीतील ०८ गुन्हे उघड करण्यात आले आहे. सदर गुन्हात एकुण ५,८०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी कडुन आणखी चोरी केलेल्या मोटार सायकल हस्तगत करण्याचे शक्यता असुन गुन्हाचा तपास चालु आहे. आरोपीतांना दि. २१/०९/२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार सा., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ सा., मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल मस्के सा. (भा.पो.से),यांच्या मार्गदशनाखाली पोलीस निरीक्षक मनोज काळबांडे, स.फौ. सुनिल मिश्रा, स.फौ. मन्नान नौरंगाबादे, पो.हवा. दिनेश गाडगे, पोशि. विवेक गाडगे, पो.शि. हेमंत बांबुळकर यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर